संजीवनी मल्टीपरपज एज्युकेशन सोसायटी, नागपूर संचलित नित्यानंद कॉन्व्हेंट स्कूल, आझाद नगर, बिडगांव, ता.कामठी, जि.नागपूर या शाळेचे, आदिवासी सामाजिक बहुउद्देशिय शिक्षण संस्था, नागपूर या संस्थेस हस्तांतर करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांकः प्राशाह ३०१८/प्र.क्र.३६९/एसएम-१
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : १९ जून, २०१९

वाचा : शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्रमांक माशाह २०११/ (२१०/११) माशि-३, दिनांक १७ फेब्रुवारी, २०१२

संदर्भ : विभागीय शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग, नागपूर यांचे क्र.प्राथ/ब/१२८१/२०१८, दिनांक १६ फेब्रुवारी, २०१८ चे पत्र.

प्रस्तावना :

संजीवनी मल्टीपरपज एज्युकेशन सोसायटी, नागपूर संचलित नित्यानंद कॉन्व्हेंट स्कूल, आझाद नगर, बिडगांव, ता.कामठी, जि.नागपूर या इंग्रजी माध्यमाच्या कायम विनाअनुदानित प्राथमिक शाळेचे, आदिवासी सामाजिक बहुउद्देशिय शिक्षण संस्था, नागपूर या संस्थेस हस्तांतर करण्याचा संदर्भाधीन पत्रान्वये प्राप्त झालेला प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय :

सदर इंग्रजी प्राथमिक शाळेचे, आदिवासी सामाजिक बहुउद्देशिय शिक्षण संस्था, नागपूर या संस्थेकडे हस्तांतर करण्यास खाली नमूद अटी व शर्तीवर मान्यता देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे :-

१) हस्तांतरणाबाबत दोन्ही संस्थांचे अध्यक्ष/सचिवांच्या स्वाक्षरीचे रु.१००/- च्या स्टँपपेपरवर नोटरी केलेले एकत्रित करारपत्र सही/शिक्यासह सादर करणे आवश्यक राहील.

२) दोन्ही संस्थांमध्ये हस्तांतरणाबाबत कोणताही आर्थिक व्यवहार झालेला नाही, याबाबत दोन्ही संस्थांचे अध्यक्ष/ सचिवांचे रु.१००/- च्या स्टँपपेपरवर नोटरी केलेले शपथपत्र सही/शिक्यासह सादर करणे आवश्यक राहील.

३) ज्या अटींवर जून्या संस्थेस शासनाने परवानगी दिलेली आहे, त्यानुसार नवीन संस्थेकडे शाळा हस्तांतरीत झाल्यानंतर मूळ अटींमध्ये बदल होणार नाही, यासंदर्भात नवीन संस्थेच्या अध्यक्ष/ सचिवांचे रु.१००/- च्या स्टँपपेपरवर नोटरी केलेले शपथपत्र सही/शिक्यासह सादर करणे आवश्यक राहील.

४) बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ नुसार व याबाबत शासनाकडून वेळोवेळी देण्यात येणाऱ्या आदेशानुसार शाळेसाठी पक्की इमारत व सर्व भौतिक सुविधा आणि शैक्षणिक सुविधा उपलब्ध करण्यात येतील, याबाबत नवीन अध्यक्ष/ सचिवांचे रु.१००/- च्या स्टँपपेपरवर नोटरी केलेले शपथपत्र सही/शिक्यासह सादर करणे आवश्यक राहील.

५) शाळेतील अर्हताप्राप्त शिक्षक/ शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे समायोजन करण्यात येईल व त्यांच्या सेवाशर्तीत बदल करण्यात येणार नाही, याबाबत नवीन संस्थेचे अध्यक्ष/सचिवांचे रु.१००/- च्या स्टँपपेपरवर नोटीर केलेले शपथपत्र सही/ शिक्यासह सादर करणे आवश्यक राहील.

६) आदिवासी सामाजिक बहुउद्देशिय शिक्षण संस्था, नागपूर या संस्थेची आर्थिक स्थिती चांगली असल्याबाबत बँक खाते शिल्लक व मुदतठेव प्रमाणपत्रांच्या आधारे खात्री करण्यात यावी.

७) शासनाकडून शाळा, शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी, वेतन/वेतनेतर अनुदान, विद्यार्थी इ.बाबत वेळोवेळी विहित करण्यात येणारे अधिनियम, नियम, शासन निर्णय व आदेशांचे पालन करणे संस्थेवर बंधनकारक राहील.

८) सदर शाळा इंग्रजी माध्यमाची कायम विनाअनुदानित शाळा असल्याने, शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे संपूर्ण आर्थिक दायित्व संस्थेवर राहील.

९) व्यवस्थापन बदल झालेल्या शाळेची कोणत्याही कारणास्तव किमान पटसंख्येची अट शिथिल केली जाणार नाही.

१०) सदर शाळा अनुदानाच्या ज्या तत्वावर आहे, त्याच तत्वावर हस्तांतरणानंतरही कार्यरत राहील.

११) व्यवस्थापन बदल झालेल्या शाळेच्या बाबतीत शासन परवानगीच्या / मान्यतेच्या कोणत्याही अटी व शर्तीमध्ये बदल होणार नाही.

१२) सदर व्यवस्थापन बदल, शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक माशाह २०११/ (२१०/११) माशि-३, दिनांक १७ फेब्रुवारी, २०१२ मध्ये विहित केलेल्या नियमानुसार व कार्यपध्दतीनुसार अंमलात येईल.

१३) सदरहू व्यवस्थापन बदलासंदर्भात शासनाकडे अथवा शिक्षण विभागाच्या क्षेत्रिय अधिकाऱ्यांकडे कोणत्याही प्रकारच्या तक्रारी प्राप्त झाल्यास किंवा व्यवस्थापन बदल संदर्भातील अटी व शर्तीचा भंग झाल्याचे निदर्शनास आल्यास किंवा व्यवस्थापन बदलापूर्वीच्या संस्थेतील कार्यरत शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सेवाशर्तीचा नवीन संस्थेव्दारा भंग झाल्यास, हस्तांतरण रद्द करण्याचे अधिकार शासनास राहतील.

२. वरील अट क्र.(१) ते (६) ची पूर्तता झाल्यावर विभागीय शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग, नागपूर यांनी सर्व बाबी तपासून आणि आवश्यक अन्य अटींचा समावेश करून, शाळेचे व्यवस्थापन बदलाबाबत ६ आठवडयात पुढील कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीबाबत शासनास अवगत करावे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०६१९१४१२५४९३२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Pravin Rajaram Mundhe

Digitally signed by Pravin Rajaram Mundhe
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8cc298cb2ba38f035e6bd1a51789c7ed1ed4f4fce865eda3495969f77d97c89a, cn=Pravin Rajaram Mundhe
Date: 2019.06.19 14:10:27 +05'30'

(प्रविण मुंढे)

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत :

१) शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.

२) विभागीय शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग, नागपूर.

३) शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नागपूर.

४) अध्यक्ष/ सचिव, संजीवनी मल्टीपरपज एज्युकेशन सोसायटी, साकार प्लाट नं.१, हनुमान नगर, मेडीकल चौक, नागपूर.

५) अध्यक्ष/ सचिव, आदिवासी सामाजिक बहुउद्देशिय शिक्षण संस्था, सोमवारी पेठ, पो.अयोध्यानगर, नागपूर-२४.

६) निवडनस्ती (एसएम-१).